भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ BT 023568

अनु.क्र. ३५३०९ दि. १६/११/२०२२ मु.शु.रक्कम ५००/-

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन —

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव निलीमा केतन घुगे

पत्ता S.B. रोड पुणे-8

दुसऱ्या पक्षकाराचे नांव PMRDA

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता ओम जोशी, ९१०२१५७० पुणे

शुभांगी सुहास बनकर
परवाना क्र. २२०११९७

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही १३४४ शिवाजीनगर, पुणे म.न.पा. समोर, पुणे-५

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

16 NOV 2022

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

NOTARY R. V. PISAL THROUGH OUT DIST. PUNE MAHARASHTRA Regd. No. 2701 Exp. Dt. 13/9/2024 GOVERNMENT OF INDIA

पाणी हमी पत्र.

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत
महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत फ्लॅट धारकाच्या खर्चाने पुरेसा पाणीपुरवठा करून देण्याची माझी / आमची जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत ला तोषिस लागू देणार नाही.

# हमीपत्र

मी/आम्ही, सिंबायोसीस तर्फे श्रीमती . निलीमा केतन घुगे, वय – सज्ञान, धंदा – नोकरी, राहणार – सिंबायोसीस सोसायटी, सेनापती बापट रोड, पुणे ४११००४. सत्य प्रतिज्ञेवर असे प्रतिज्ञापत्र करून देते की,

**मौजे नांदे, ता. मुळशी, गट नं. ४७/१ व ४७/२, जिपुणे,** यांसी एकुण क्षेत्र १९९२१.०० **चौ.मी.** या मिळकतीमध्ये निवासी / बिगर निवासी पद्धतीचे प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जगामालक / कुलमुखत्यारधारक म्हणून मी/आम्ही दाखल केला आहे.

१) तूर्त या जागी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला/आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहोत. यासंबंधी आवश्यक त्या वरीष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भुजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S. & D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी / बिगरनिवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत कडून पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतींमधील रहिवाश्यांच्या खर्चाने करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी/आम्ही या हमीपत्राद्वारे स्विकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरू न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी/आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळ्याचे विक्रीचे बुकींग करून करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करून घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजीत गाळेधारकांना दिल्यानंतरसुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकींगनंतर होणाऱ्या िनयोिजतगाळेधारकांना पाणीपुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत फ्लॅट धारकाच्या खर्चाने पुरेसा पाणीपुरवठा करून देण्याची माझी / आमची जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत ला तोषिस लागू देणार नाही.

५) टँकरद्वारा किंवा बोअरद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची मी/आम्ही काळजी घेईन/घेऊ.

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक / मालक या नात्याने मी / आम्ही अन्य कोणास भविष्यकाळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन. तसेच त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी घेईन / घेऊ.

७) हे हमीपत्र माझे /आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी/आम्ही राजीखुषीने दि. 17 NOV 2022 रोजी लिहून दिले आहे.

ठिकाण : पुणे

दिनांक : 17 NOV 2022

ओम पंढरीनाथ ज्वारी.

SYMBIOSIS SOCIETY PUNE-4.

हमीपत्र लिहून देणार,

सिंबायोसीस तर्फे

श्रीमती . निलीमा केतन घुगे

मुख्य आस्थापना विभाग

BEFORE ME

R. V. PISAL
NOTARY GOVT. OF INDIA

NOTARY R. V. PISAL THROUGH OUT DIST. PUNE MAHARASHTRA Regd. No. 701 Exp. Dt. 13/9/2024 GOVERNMENT OF INDIA

Noted and Registered
at Sr. No. 3380/22
Date:- 17 NOV 2022